सायं.दैनिक
# विश्वनायक
• संपादक : बिलाल शेख •
Email : vishvanayak94@gmail.com
Mo.86868 88898

| बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - २३५ | सोमवार, दि.०१ सप्टेंबर २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 235 | MONDAY, DT.01 SEPTEMBER 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4 |




कळंब /बिलाल कुरेशी

कळंब तालुक्यातील शिराढोण येथे दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी ईद-ए-मिलादुन्नबी जुलूस कमिटीची बैठक उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात संपन्न झाली. हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती उत्सवाच्या जुलूसाच्या आयोजनासाठी झालेल्या या बैठकीत हाजी मंजूर कुरेशी यांची अध्यक्षपदी,अब्दुल सलाम समद डांगे यांची उपाध्यक्षपदी तर इस्माईल कुरेशी यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली.बैठकीस कमिटीचे सदस्य अजिज आतार, बाबा खतीब, साबेर कुरेशी, फिरोज कुरेशी, खय्युम कुरेशी, नियोजुद्दीन शेख, इकबाल तांबोळी, आयात डांगे, नसिर कुरेशी यांची विशेष उपस्थिती होती. मार्गदर्शक म्हणून आयुब भाई कुरेशी राजु भाई डांगे, शकील डांगे, , एजाज डांगे यांनी सहभाग नोंदवला. या बैठकीनंतर नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी शिराढोण पोलीस ठाण्याचे निरीक्षक धरणीदर कोळेकर यांना जुलूसासाठी आवश्यक परवानगीबाबत निवेदन सादर केले.कार्यक्रमाची संपूर्ण प्रक्रिया शांतता, बंधुता आणि ऐक्याच्या वातावरणात पार पडल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# जरांगेंचा लढा:मुंबईचे रस्ते मोकळे करा, आंदोलन आझाद मैदानावरच, कोर्टाचे आदेश; उद्या दुपारी ३ वाजता सुनावणी

मुंबई /प्रतिनिधी

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात आझाद मैदानात आंदोलन करण्यात येत आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे.

आरक्षणावर निर्णय होत नाही म्हणून संतापलेल्या जरांगेंनी आजपासून पाणीही सोडण्याचा इशारा दिलाय. सरकार आणि प्रशासनाच्या पातळीवर यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

उद्या दुपारी ३ वाजता सुनावणी

अटी-शर्थींच्या आधारे पाच हजार आंदोलकांना पुन्हा परवानगी देऊ शकता. मात्र, नियम आणि अटींचे पालन करावेच लागेल, अशा सूचनाही कोर्टाने दिल्या. उच्च न्यायालयातली आजची सुनावणी संपली असून, उद्या दुपारी तीन वाजता पुन्हा यावर सुनावणी होणार असल्याचेही कोर्टाने सांगितले.

जरांगेंची तब्येत बिघडल्यास तात्काळ उपचार द्या

जेवणाचे ट्रक मुंबईत यायला परवानगी नको, असा युक्तिवाद गुणरत्न सदावर्ते यांनी केला. तसे केल्यास इतर समाजाला सुद्धा परवानगी द्यावी लागेल, असे सदावर्ते म्हणाले. मात्र, सर्वांना आंदोलन करण्याचा अधिकार आहे. अगदी सदावर्तेंना सुद्धा, असे उत्तर कोर्टाने दिले. जेवण आणि पाण्याचे साहित्य आणण्यास तात्पुरती परवानगी असल्याचेही कोर्टाने म्हटले. तसचे जरांगेंची तब्येत बिघडल्यास त्यांना तात्काळ उपचार देण्यात यावेत, असे आदेश कोर्टाने दिलेत.

गणेशोत्सवात कोंडी नको

गणेशोत्सवात मुंबईत कोंडी व्हायला नको. मुंबईत ज्या-ज्या ठिकाणी रस्ते आडवले आहेत, ते रस्ते मोकळे करा. आंदोलकांना रस्त्यावरून हटवा. उद्या चारपर्यंत ही कारवाई करा. आझाद मैदानाव्यतिरिक्त कुठेही आंदोलन होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. मुंबईबाहेरून येणाऱ्यांना वेशीवरच आडवा, असे आदेश कोर्टाने दिलेत.





## तुम्ही आदेश द्या-सदावर्ते

सात दिवसांच्या गणपतीचे उद्या विसर्जन आहे. त्यामुळे अधिक गर्दी असते, असे महाधिवक्त्यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले. तर सरकार लोकांना काढू शकत नाही, तुम्ही आदेश द्या, त्याची अंमलबजावणी होईल, असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले. मनोज जरांगे, वीरेंद्र पवार यांना नोटीस द्या. नियम आणि अटी यांचे उल्लंघन होत असल्याचे कळवा, असे कोर्ट म्हणाले. ती नोटीस तुम्ही देऊ शकता का, असा सवाल कोर्टाने केला आहे.




## जरांगेंनी नोटीस स्वीकारली नाही

सुनावणीवेळी कोर्ट म्हणाले की, आझाद मैदानाव्यतिरिक्त इतर ठिकाणी आंदोलकांनी वावरू नये. पाच हजारांपेक्षा जास्त लोक आणू नये, ही आयोजकांची जबाबदारी होती. पहिल्या दिवशी सहानंतर मैदान खाली करणे आवश्यक होते. आमरण उपोषणाला परवानगी नव्हती. आंदोलनाला एकच दिवसाची परवानगी होती, अशी निरीक्षणे नोंदवली. तेव्हा आंदोलकांच्या वकिलांनी आधी सरकारने परवानगी दिली. मात्र, आता ते नाही म्हणतात, अशी बाजू मांडली. यावेळी कोर्टाने परवानगीच्या प्रतीची विचारणा केली. सरकारकडून मनोज जरांगेंना पोलिसांनी नोटीस दिली होती, पण त्यांनी ती स्वीकारली नसल्याचे सांगण्यात आले.

## डिप्लोमॅटीक वागू नका

आझाद मैदानात पाच हजार आंदोलकाव्यतिरिक्त इतर आंदोलक नको, असे आदेश कोर्टाने दिलेत. जरांगे यांनी लोकांना रस्ते आडवायला सांगितले नाही, असा युक्तिवाद आंदोलकांच्या वकिलांनी केला. मग रस्त्यावर फिरणाऱ्यांना आवाहन करून मुंबई बाहेर घालवणार का, असा सवाल कोर्टाने केला. तेव्हा वकिलांच्या वतीने आम्ही फक्त आवाहन करू शकतो, असे सांगण्यात आले. तेव्हा आमच्याशी डिप्लोमॅटीक वागू नका, असे खडेबोल कोर्टाने सुनावले.

# पालकमंत्री अजित पवार आपण लक्ष घाला

## बीडीओ केंद्रे कडून घरकुल चेक वाटपात भेदभाव - विष्णू मुंडे

परळी /प्रतिनिधी

परळी पंचायत समितीमध्ये अनेक वर्षापासून मुंडे कुटुंबीयांची सत्ता आहे. त्यामध्येच राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे पंचायत समितीमध्ये अनेक वर्षापासून त्यांच्या समर्थकांच्या हातात सत्ता आहे. ते फक्त जवळच्या समर्थक व कार्यकर्त्यांचे घरकुल मंजूर करून त्यांनाच घरकुल चे चेक वाटप करतआहेत असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते विष्णू मुंडे यांनी केला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री या प्रकरणाकडे लक्ष द्यावेत.

घरकुल मंजूर लाभार्थी जर विरोधी गटातला असला तर त्याला कसल्याही प्रकारचे सहकार्य पंचायत समिती परळी मध्ये केलं जात नाही. त्या लाभार्थ्याला एक तर पैशाची मागणी केली जाते किंवा पंचायत



समितीच्या कार्यालयात चकरा मारून चप्पल झिजून जातो. परंतु त्याचे काम होत नाही. ते जाणीवपूर्वक विरोधक असल्यामुळे केले जात नाही. असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे विष्णू मुंडे यांनी केला आहे. आठ दिवसात चेक वितरित न झाल्यास अनोखे आंदोलन पंचायत समिती समोर व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यालय समोर करण्यात येणार असल्याचा इशारा विष्णू मुंडे यांनी एका पत्रका द्वारे केला आहे.

# लिंबागणेश येथे रास्ता रोको ; मनोजदादा जरांगे पाटलांच्या उपोषणाला पाठिंबा आंदोलनाची धग वाढली:-डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश :-(दि.०१)सरकार मराठा आरक्षणाच्या मागण्या पूर्ण करत नसल्याने मनोजदादा जरांगे पाटलांनी आजपासून पाणी त्याग करून कडक उपोषणाला सुरुवात केली. त्यामुळे आंदोलनाची धग अधिक वाढली आहे.

त्याच धर्तीवर बीड तालुक्यातील अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग (क्र. ५४८ डी) वरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान, लिंबागणेश येथे मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१ सोमवार रोजी सकाळी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. बहुजन समाजातील बांधवांनी जरांगे पाटलांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा दर्शविला व मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी केली.

निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पद्माकर आहेर,सपो.लक्ष्मण बीडकर, बाबासाहेब राख, गोविंद बडे पोह.प्रशांत क्षीरसागर, सतिश राऊत, अविनाश घुंगरट, विशाल क्षीरसागर, बाळासाहेब ढाकणे, विशाल कदम,महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी महादेव जायभाये,




तलाठी गणपत पोतदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक बीड यांना देण्यात आले. यावेळी मुळकुवाडीचे सरपंच रामकिसन कदम, धनगर समाजाचे नेते कृष्णा पितळे आदींची भाषणे झाली.आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.मात्र यावेळी रूग्णवाहिकेला मोकळी वाट करून देण्यात आली. यावेळी आंदोलनात लिंबागणेश पंचक्रोशीतील सकळ मराठा समाजा बरोबरच गावगाड्यातील

बहुजण समाजातील बांधवांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, पोखरीघाटचे सरपंच बाबासाहेब मुळीक, अंजनवतीचे सरपंच सुनिल येडे, मेंगडेवाडीचे ज्ञानेश्वर मेंगडे, प्रशांत कदम, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, औदुंबर नाईकवाडे, सुंदरराव जाधव, पांडुरंग वाणी, गणपत तागड,समीर शेख,अशोक वाणी,अक्षय येडे ,संजय घोलप,अजय थोरात,आदी सहभागी होते

सरकारने न्यायालयाचा हवाला देत मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. यावर तोडगा म्हणून जरांगे पाटलांनी सरसकट हा शब्द वगळत, ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे मराठा व कुणबी एकच असल्याने तातडीने अध्यादेश काढावा, असा पर्याय दिला आहे.

मुंबईतील आंदोलनकर्त्यांची उपासमार - अमानवीय कृत्याचा सर्वत्र निषेध


मुंबईतील आझाद मैदानावर जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ जमलेल्या कार्यकर्त्यांसाठी हॉटेल व दुकाने बंद ठेवून अन्नपुरवठा बंद करण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात आला. हा अमानवीय व संवेदनाहीन प्रयत्न असल्याचे सांगून सर्वांनी याचा तीव्र निषेध केला.मुंबईतील बांधवांना सर्वोतोपरी मदत पाठवली जाईल, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी केला.

# ॲड. शेख शफिक भाऊ यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा होणार

## शेख एजाज खन्ना भैय्या, शिवाजीराव भोसकर

बीड (प्रतिनिधी) - एआयएमआयएम पक्षाचे बीड मा जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचा वाढदिवस दरवर्षीप्रमाणे यावेळीही विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी केले आहे.

अजीज-ए-मिल्लत एआयएमआयएम पक्षाचे मा बीड



जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांच्या वाढदिवसानिमित्ताने दिनांक २ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी विविध सामाजिक उपक्रममाचे

आयोजन करण्यात आले आहे. ज्यात रक्तदान शिबिर, अन्नधान्य किट वाटप, जिल्हा रुग्णालय येथे खिचडी व फळ वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप, इन्फंट इंडिया (पाली) एचआयव्ही ग्रस्त बालकांना खाऊ वाटप, बे-घर निवारा केंद्र येथे वृद्धांना जेवणाची व्यवस्था, झाडे लावा झाडे जगवा मोहीम, मोफत आरोग्य तपासणी शिबिर, हजरत शहंशाह वली दर्गा येथे गोर-गरीब लोकांना जेवणाची व्यवस्था, क्रिकेट स्पर्धा इत्यादी सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या सर्व सामाजिक उपक्रमात एआयएमआयएम पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह जनतेचाही मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे. तरी या सर्व उपक्रमांचा सर्व जनतेने लाभ घ्यावा असे तसेच बीडसह जिल्ह्यामध्ये विविध सामाजिक उपक्रमाने होणार आहे .असे आवाहन पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष शेख एजाज उर्फ खन्ना भैय्या आणि शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांच्याकडून करण्यात आले आहे.



बीड - भटके विमुक्त दिनाचे औचित्य साधून जामखेड निवारागृह येथे वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ता अरुण आबा जाधव यांनी राज्यस्तरीय भटके विमुक्त परिषद आयोजित करून यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना पत्रकार बालाजी जगतकर, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम (गोटू)वीर, अन्वर पाशा,भूषण लोळगे, सुशील काकडे आधी दिसत आहेत.

सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •  Mo-9422404740



# ज्येष्ठा गौरी आणि श्री गणेश आपुलकीची सांस्कृतिक धारा

गणेशोत्सवाच्या उत्साहात महाराष्ट्रात घराघरांत येणाऱ्या ज्येष्ठा गौरींचे आगमन हा भक्तिभाव , सौंदर्य आणि ऐक्याचा मंगल सोहळा असतो . सोन्याच्या पावलांनी आल्या सारख्या मानल्या जाणाऱ्या या गौरींचे आगमन म्हणजे घरात सुख , शांती आणि ऐश्वर्याची चाहूल लागल्यासारखी भावना प्रत्येक कुटुंबाच्या मनात दाटते . अंगणातल्या रंगीबेरंगी रांगोळ्या , फुलांच्या माळा , आरत्यांचे सूर आणि स्त्रियांच्या ओव्यांनी सजलेले वातावरण जणू परंपरा आणि आनंदाचा संगम घडवते .

ज्येष्ठा गौरी या पार्वतीचे रूपं मानल्या जातात , त्या शुद्धता , समृद्धी आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत . गणेश हा पार्वतीचा पुत्र असल्याने ज्येष्ठा गौरी आणि गणेश यांचे नाते हे अतिशय घट्ट , आपुलकीचे व आई-मुलाचे स्वरूप आहे . म्हणूनच गणेशोत्सवात गौरी पूजनाचे स्थान विशेष आहे . महाराष्ट्रात हा सण विशेष भक्तिभावाने साजरा होतो . गणपतीच्या आगमनापूर्वी गौरींचे स्वागत केले जाते , त्यांना फुलांची व पारंपरिक सजावटीची आरास केली जाते , विविध नैवेद्य दाखवले जातात आणि गाणी-ओव्या म्हणत वातावरण मंगलमय केले जाते .

इतिहासाच्या संदर्भात पाहिले तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात पुणे परिसरात गणेशोत्सव कौटुंबिक पातळीवर दिमाखात साजरा होत असे . पुढे लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप देत समाजातील एकात्मतेचा ध्यास घेतला . याच काळात गौरी पूजनालाही घराघरात धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले . विशेषत: स्त्रियांसाठी हा उत्सव आनंदाचा , सजावटीचा आणि सामूहिक कार्यक्रमांचा मानबिंदू बनला . ज्येष्ठा गौरींच्या आगमनामुळे कुटुंबात ऐक्य , स्त्रीशक्तीचा सन्मान आणि घराघरात सुख-समृद्धी येते अशी दृढ श्रद्धा आहे .

लोककथांनुसार गौरी या महालक्ष्मीच्या बहिणी मानल्या जातात . भक्तांच्या घरी दोन दिवसांसाठी माहेरी आल्या म्हणून त्यांचे स्वागत मोठ्या आदराने केले जाते . काही ठिकाणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा अशा दोन गौरी घरात आणल्या जातात . त्यांचे आगमन म्हणजे आईच्या रूपात आलेल्या देवीचे दर्शन . म्हणूनच त्यांच्यासाठी पारंपरिक पदार्थ बनवले जातात .

२०२५ मध्ये ज्येष्ठा गौरी अवहण रविवार , ३१ ऑगस्ट रोजी . मुख्य पूजन सोमवार , १ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजून ५९ मिनिटांपासून संध्याकाळी ६ वाजून ४३ मिनिटांपर्यंत पार पडेल . विसर्जन मंगळवार , २ सप्टेंबर रोजी होईल . या तीन दिवसांत घराघरात भक्तिभाव , सजावट आणि ऐक्याचे वातावरण असते . गौरींचे स्वागत करताना अंगणात रंगीबेरंगी रांगोळ्या काढल्या जातात , हळदीकुंकवाचे समारंभ आयोजित केले जातात आणि महिला एकत्र येऊन गाणी व ओव्या गातात .

गौरी आई आली अंगण फुलांनी भरलं , ये ग ये ग गौरी , ओटी भरुन दे ग , गणपती बाप्पा येती सुख समृद्धी घेऊन , गौरी आली घरोघरी , भरभरून आली संपत्ती सारी अशा ओव्या पारंपरिक वातावरणाला साजेशा ठरतात . गौरी पूजनाच्या दिवशी खास जेवणाचा बेत आखला जातो . उकडीचे मोदक , घारगे , करंजी , पुरणपोळी , पिठलं-भात , डाळ-भात , पिठाचे लाडू , हळदीचे दूध असे विविध पदार्थ नैवेद्य म्हणून ठेवले जातात . या पाककृती केवळ चवीसाठी नसून परंपरेचा वारसा आणि स्त्रियांच्या कष्टाचे व कौशल्याचे दर्शन घडवतात .

गौरीची आरती
भाद्रपद शुद्ध सप्तमीस प्रतिष्ठा
अनुराधा नक्षत्र ज्येष्ठा श्रेष्ठा
गणेशा सहित गौरी धनिष्ठा
बैसली येउनि सकळिया निष्ठा ।।१।।
जयदेव जयदेव जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव जयदेव ।। धृ।।
ज्येष्ठा नक्षत्र पुजेचा महिमा
षडरस पक्वान्ने होती सुखधामा
सुवासिनी ब्राह्मण अर्पुनी निजनेमा
तुझे आशीर्वादे सकलही धामा ।।२।।
जयदेव जयदेव जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव जयदेव ।। धृ।।
उत्थापन मूळावर होता अगजाई
वर देती झाली देवी विप्राचे गृही
रुद्र विश्वनाथ भक्ताचे ठायी
वर देती झाली देवी सकळांचे गृही ।।३।।
जयदेव जयदेव जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव जयदेव ।। धृ।।

गौरी पूजनाचे महत्व केवळ धार्मिक नाही तर सामाजिक दृष्ट्याही आहे . हा सण म्हणजे कुटुंबातील स्त्रियांचा आत्मसन्मान , समाजातील बंधुता आणि शेजारधर्माचे प्रतिक आहे . समाजातील बंध दृढ करण्यासाठी , शेजाऱ्यांत मैत्री वाढवण्यासाठी आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी गौरी पूजनाची परंपरा आजही उपयुक्त ठरते . ज्येष्ठा गौरींचे आगमन म्हणजे घराघरात आनंदाचा , सौहार्दाचा व ऐश्वर्याचा प्रकाश पसरवणे होय .

नवीन पिढीसाठी या उत्सवाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे . आजच्या धावपळीच्या जीवनात गौरी पूजनामुळे कुटुंब एकत्र बसते , परंपरा जपल्या जातात , संस्कृतीचा वारसा पुढे नेला जातो आणि समाजात ऐक्याची भावना वाढीस लागते . गौरी पूजन हा स्त्रीशक्तीचा गौरव करणारा सण आहे . म्हणूनच ज्येष्ठा गौरींचे पूजन म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून स्त्रीशक्तीचा सन्मान , परंपरेचा वारसा आणि सामाजिक सलोख्याचा अनमोल ठेवा आहे.

# नवसाला पावणाऱ्या राजमुद्रा गणपतीच्या दर्शनासाठी भाविक-भक्तांची प्रचंड गर्दी

केज । प्रतिनिधी

केज शहरातील पंचायती समितीच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या नवसाला पावणाऱ्या राजमुद्रा गणपतीच्या ११ व्या वर्षाच्या महोत्सवाला भाविक-भक्तांची प्रचंड गर्दी उसळली आहे. गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी केवळ केज तालुक्यातीलच नव्हे, तर जिल्हाभरातून भक्तांचा ओघ सुरू आहे. श्रद्धावान भाविक गणपतीच्या चरणी आपले नवस अर्पण करून सुख, शांती, समृद्धीची प्रार्थना करत आहेत.



गणेशोत्सवाच्या निमित्ताने पंचायती समितीचे मैदान रोषणाईने उजळून निघाले आहे. लहान-मोठ्यांसाठी मनोरंजनाचे आकर्षक झोके, रहाटपाळणे, विविध प्रकारचे खाऊ व खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, खेळणी, कपडे, सजावटीच्या वस्तूंची दुकाने यामुळे उत्सवाचे वातावरण अधिकच रंगतदार झाले आहे. महिलांसाठी खास कलात्मक वस्तूंची दुकाने, मुलांसाठी खेळणी आणि खाऊ-पिऊची रेलचेल सुरू आहे.

गणेश मंडळाच्या वतीने दैनिक सकाळी व संध्याकाळी आरती, विविध धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक तसेच बाहेरगावच्या कलाकारांच्या कीर्तन व प्रवचनांनी भक्तांना आध्यात्मिक उभारी मिळत आहे. तरुण मंडळींच्या उत्साहाने मंडळाची आकर्षक सजावट, देखावे आणि दिव्यांची रोषणाई लक्षवेधी ठरत आहे.

दररोजच्या आरतीनंतर मंडळाच्या वतीने भाविकांसाठी प्रसादाचे वाटप केले जात असून शिस्तबद्ध दर्शन व्यवस्थेसाठी स्वयंसेवक मंडळ दिवसरात्र कार्यरत आहे. पोलिस प्रशासन, नगरपंचायत आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने उत्सवात येणाऱ्या भाविकांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

गणेश भक्तांचा ओघ दिवसेंदिवस वाढत असून आगामी दिवसांत अधिक भाविकांच्या गर्दीची अपेक्षा राजमुद्रा गणेश मंडळाचे सर्वेसर्वा अमर पाटील यांनी व्यक्त केली आहे. केज शहरातील राजमुद्रा गणपती उत्सव सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांसह एक उत्सव सोहळा बनला असून गावागावातील भक्तांची उपस्थिती केज तालुक्यातील एकात्मतेचे दर्शन घडवत आहे.



मा,ना,पंकजाताई गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली मा,खा,डॉक्टर प्रीतमताई गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यनाथ बँक परळी ची निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष यशश्री निवासस्थानी भेटून हार्दिक हार्दिक अभिनंदन शुभेच्छा देताना द्वारकाधीश मित्र मंडळ,बीड.



समद शेख (ताडसोन्ना ) काल ताडसोन्ना येथे भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषद आमदार अमितजी गोरखे यांनी भेट दिली.बोलताना सांगितले मातंग समाजाच्या हक्कासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.समाजाच्या न्याय हक्कांसाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.येणाऱ्या काळामध्ये समाजाच्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी सरकारकडे पाठपुरावा करणे कर्तव्य आहे.सर्व समाज बांधव युवकांनी योजनेचा लाभ घ्यावा. सर्व समाजबांधवांच्या वतिने सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित संतोष लाखे, गणेश माने, विनोद मुंडे, सुरेश गायकवाड,विकास पौळ,बाळु मिसाळ,आमोल सपकाळ,कैलास पौळ,बापु पौळ,लक्ष्मण मिसाळ,मचिंद्र मिसाळ,रतन मिसाळ बाळु गायकवाड,विलास पौळ,अक्षय साठे,आमोल मिसाळ,शकील शेख,रंजित गायके,अदि दिसत आहेत.

# नागरिकांनी गणेशोत्सव मोठ्या आनंदात व शांततेत साजरा करा - पो. नि. अशोक मुदिराज

## पो. नि. अशोक मुदिराज हस्ते लोकशाही पत्रकार संघाच्या 'श्री' ची आरती संपन्न

बीड (प्रतिनिधी)

गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची

हिंदू संस्कृती आहे त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन पेठ बीड पोलीस स्टेशन पो. नि. अशोक मुदिराज यांनी लोकशाही पत्रकार संघाचा धानोरा रोडचा राजा गणेश मंडळाच्या येथे 'श्री' च्या आरतीच्या निमित्ताने केले. प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने धानोरा



रोड परिसरात लाडक्या गणरायाची स्थापना करण्यात आली. स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळची आरती लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. सायंकाळची आरतीसाठी पेठ बीड पोलीस स्टेशन चे पो. नि. अशोक मुदिराज

आणि समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या नंतर सायंकाळी सातच्या सुमारास पो. नि. अशोक मुदिराज

आणि मेश्राम मॅडम यांच्या शुभहस्ते श्रींची आरती करण्यात आली. आरती संपन्न झाल्यानंतर अशोक मुदिराज यांनी सर्व सण आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सणासह

ईद सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन पो. नि. मुदिराज यांनी केले.

तसेच देव, देश आणि धर्म यासाठी आपण सर्वांनी मिळून सातत्याने काम केले पाहिजे. समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम यांनी यावेळी सांगितले. आरती नंतर पो. नि. अशोक मुदिराज यांचा लोकशाहीचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व जिल्हाध्यक्ष सहस आदोडे, आत्माराम वाव्हाळ, संजय देवा कुलकर्णी यांनी सत्कार केला. तर मेश्राम मॅडम यांचा सत्कार अँड सुप्रिया गिरी, संध्या सिरसाट यांनी केला. यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, शिवप्रसाद सिरसाट, अविनाश कुलकर्णी सह आदी उपस्थित होते.

# ग्रामीण मुलीचे वैद्यकीय शिक्षणातील यश सर्वांसाठी प्रेरणादायी- महादेव इटके

परळी : परळी शहरातील कु. मधुरा संदीप तिळकरी हिने छएएढ २०२५ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आपल्या परिवारासह शहराचेही नाव उज्वल केले आहे. तिचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे एम.बी.बी.एस. या कोर्ससाठी प्रवेश निश्चित झाला आहे. या यशाचा आनंद व्यक्त करत आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, परळी वै यांच्या वतीने तिचा उत्साहवर्धक सत्कार करण्यात आला.



सत्कार कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक महादेव इटके, आर्ट ऑफ लिव्हिंगचे ज्येष्ठ प्रशिक्षक श्री. सुदाम कापसे, श्री. शिरीष चौधरी, सौ. रेणुका चौधरी, कु. मधुरा महादेव इटके, श्री. संदीप तिळकरी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच संस्थेचे ज्येष्ठ स्वयंसेवक श्री. संजयभैया सेवलकर यांनीही उपस्थित राहून कु. मधुरा हिच्या मेहनतीचे व जिद्दीचे मनापासून कौतुक केले.

यावेळी बोलताना भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक महादेव इटके म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील मुलीने वैद्यकीय क्षेत्रात दाखल होणे हा आनंदाचा विषय असून, हे यश सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. कु. मधुरा हिने आपली अभ्यासातील प्रामाणिकता, चिकाटी व शिस्तीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. पुढील वैद्यकीय शिक्षणातही ती निश्चितच उत्कृष्ट यश संपादन करून समाजसेवेसाठी आपले योगदान देईल, असे प्रतिपादन श्री इटके यांनी केले.

कु. मधुराच्या या यशामध्ये तिचे वडील आदर्श शिक्षक श्री. संदीप तिळकरी यांचा विशेष मोलाचा वाटा आहे. त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी सातत्याने योग्य मार्गदर्शन केले तसेच अभ्यासातील शिस्त, वेळेचे नियोजन आणि प्रामाणिक परिश्रम यांचे महत्व समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, मुलीने मेहनत आणि शिस्त यावर विश्वास ठेवून हे यश मिळवले आहे. पुढे ती डॉक्टर म्हणून समाजसेवेत कार्य करेल, हीच आमची अपेक्षा आहे.

यासोबतच काका श्री. दीपक तिळकरी, काकू सौ. वर्षा दीपक तिळकरी आणि भाऊ चि. सोहम यांनीही अखंड पाठबळ दिले. त्यांच्या प्रेरणेने आणि सहकार्यानेच मधुराने हे स्वप्न साकार केले.

कार्यक्रमाच्या शेवटी आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने कु. मधुरा हिला उज्वल भवितव्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. पालक, नातेवाईक व शिक्षकांनीही तिच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला.



रामेश्वर तांगडे प्रतिनिधी जांब समर्थ/२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज दादा जरांगे पाटील यांनी अहिंसेच्या मार्गाने गरजवंत मराठ्यांच्या आरक्षणासाठी मुंबई येथे लोकशाही मार्गाने आरक्षणाचे रणशिंग फुंकले आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील कोट्यावधी गरजवंत मराठे एक वाटले आहे. आपल्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या मराठे बांधवांना महाराष्ट्रातील विविध गावातून मधु करी मागून दररोज मुंबई येथे समाज बांधवांना ठेचा, शेंगदाण्याची भुरकी, लोणचं, भाकरी, उदरनिर्वाह करता पाठवीत आहेत. याच प्रकारे आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रविवार रोजी समर्थ रामदास स्वामी यांची जन्मभूमी येथून भाकरी, ठेचा, शेंगदाण्याची भुरकी या प्रकारे उदरनिर्वाह करण्यासाठी एक पिकअप घेऊन मराठे स्वयंसेवक मुंबईकडे रवाना झाले आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com